|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## मानवविज्ञान विद्याशाखा आणि अंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

जा. क्र.कबचौउमवि/7-इ/ भूगोल/प्रात्याक्षिक/4936/2019 दि.07/10/2019

मा.प्राचार्य
कबचौउमविशी संलग्न सर्व कला
महाविद्यालये यांना.

**विषय :-** पदवी स्तरावरील द्वितीय व तृतीय वर्ष कला वर्गाच्या भूगोल विषयाच्या प्रात्याक्षिक परीक्षेबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की दि. 01.11.2019 पासून विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या थेअरी परीक्षा सुरू होत आहेत. त्या अनुषंगाने तृतीय वर्ष भूगोल या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील प्रमाणे आयोजित करण्यात येत आहेत:-

| | |
|---|---|
| TY BA Geography | थेअरी परीक्षेच्या आधी 12.10.2019 ते 16.10.2019 दरम्यान |

उपरोक्त वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका व परीक्षकांची नांवे विद्यापीठाद्वारा कळविण्यात येतील.

द्वितीय वर्ष सेमिस्टर 3 व 4 व तृतीय वर्ष सेमिस्टर 6 च्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा रेग्युलर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या सोईनुसार आयोजित करण्यात याव्यात.

प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणयादया परीक्षकांनी मोहोरबंद करून त्याच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे जमा कराव्यात. मा.प्राचार्य यांनी शेवटची प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर दोन ते तीन दिवसांच्या आत त्या त्या विषयाच्या मोहोरबंद गुणयादी त्या त्या विद्यार्थ्यांच्या उपस्थिती अहवालासह विद्यापीठ कार्यालयात सादर कराव्या.

गुणयादी तयार करतांना गुणांमध्ये अंकी गुण नोंदविण्या बरोबरच अक्षरी गुण सुध्दा नोंदविण्यात यावेत, तसेच गुणामध्ये खाडाखोड किंवा गिरवागिरव करू नये, खाडाखोड झाल्यास परीक्षकांनी तेथे स्वाक्षरी करावयाची आहे, गुणयादीवर कुठेही व्हाईटनरचा वापर करू नये, तसे केल्यास निकाल जाहीर केला जाणार नाही.

गुणयादया मुदतीत सादर न केल्यास, प्रात्यक्षिक / अंतर्गत परीक्षेच्या गुणयादया सादर करणे व त्याअनुषंगाने झालेल्या विलंबास दंड आकारणे बाबतचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/7अ/अंतर्गत-प्रात्यक्षिक गुणयादया/380/2019 दि.04/02/2019 नुसार दंड आकारण्यात येईल, त्यानंतर मात्र गुणयादया स्विकारण्यात येणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

द्वितीय वर्ष कला CBCS सुधारीत अभ्यासक्रमाअंतर्गत Geography, Psychology यांच्या अंतर्गत CA-(40 गुणांची) प्रात्यक्षिक परीक्षेचे मूल्यमापन प्रथम सत्रातच करावे. सदर वर्गांच्या बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा (60 गुणांची) द्वितीय सत्राच्या शेवटी घेण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे कार्यवाही करून परीक्षा सुरळीत पार पाडून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

Sd/-
(भ.प्र.पाटील)
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ,**
**क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव.**

**प्रत माहितीसाठी:-**

१) मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि जळगाव
२) केंद्रप्रमुख संगणक केंद्र, कबचौउमवि जळगाव
३) उपकुलसचिव,कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि जळगाव
४) सहा. कुलसचिव,परीक्षा विभाग, कबचौउमवि जळगाव
५) सहा.कुलसचिव,परीक्षा पुर्वार्ध विभाग, कबचौउमवि जळगाव
६) सहा.कुलसचिव,परीक्षा उत्तरार्ध विभाग, कबचौउमवि जळगाव